मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली अंतर्गत वाकवली विभाग येथील खालिल प्रमाणे कामे करावयाची आहेत.

अ) फणस आणि जांभुळ कलमे :–

| अ. क्र. | कामाचा तपशिल | विक्रीयोग्य कलमे उद्दिष्ट |
|---|---|---|
| १) | फणस आणि जांभुळ कलमांसाठी डिफोलिएशन करणे | ४००० |
| २) | फणस आणि जांभुळ अंकुर काडया काढणे | |
| ३) | फणस आणि जांभुळ कलमे बांधणे | |
| ४) | बांधलेल्या फणस आणि जांभुळ कलमांना पाणी घालणे, फुट काढणे, पिशवीतील गवत काढणे, तसेच सदर कलमांवर रोग व किड येवु नये म्हणुन फवारणी काम करणे, सुक्ष्म अन्नद्रव्यांची फवारणी करणे व विक्री योग्य कलमे १५ मार्च २०२१ पर्यंत ताब्यात देणे. | |

ब) कोकम आणि करवंद कलमे :–

| अ. क्र. | कामाचा तपशिल | विक्रीयोग्य कलमे उद्दिष्ट |
|---|---|---|
| १) | कोकम आणि करवंद अंकुर काडया काढणे | ४००० |
| २) | कोकम आणि करवंद कलमे बांधणे | |
| ३) | बांधलेल्या कोकम आणि करवंद कलमांना पाणी घालणे, फुट काढणे, पिशवीतील गवत काढणे, तसेच सदर कलमांवर रोग व किड येवु नये म्हणुन फवारणी काम करणे, सुक्ष्म अन्नद्रव्यांची फवारणी करणे व विक्री योग्य कलमे १५ मार्च २०२१ पर्यंत ताब्यात देणे. | |

उपरोक्त प्रमाणे प्रक्षेत्रावरील फणस, जांभुळ, कोकम, करवंद कलमे बांधणेची कामे ठेका पध्दतीने करावयाची आहेत. कामाच्या अटी व शर्ती इत्यादी माहिती तसेच भरून दयावयाचे संमत्तीपत्र आणि दरपत्रक नमूना या कार्यालयात कार्यालयीन कामाच्या दिवशी व कार्यालयीन वेळेत उपलब्ध होईल. कंत्राटी कामाचे दरपत्रकामध्ये प्रती कलम बांधणी दराचा स्पष्टपणे उल्लेख करावा. दरपत्रक या कार्यालयाने तयार केलेल्या नमूना पत्रामध्येच भरून द्यावयाचे आहे. आपले दरपत्रक आणि संमतीपत्र या कार्यालयात दिनांक २०.१०.२०२० पर्यंत किंवा त्यापुर्वी पोहोचेल असे पाठवावे. विहीत दिनांकानंतर प्राप्त होणा–या दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही. लखोटयावर **"मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली अंतर्गत वाकवली विभागात फणस, जांभुळ, कोकम, करवंद कलमे ठेका पध्दतीने बांधणे"** असा उल्लेख करावा, लिफाफा मोहोरबंद करून मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली (वाकवली विभाग) यांचे नावे पाठवावा. पोस्टाव्दारे होणा–या विलंबास हे कार्यालय जबाबदार असणार नाही. दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणेचा संपुर्ण अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांचा राहील. दरपत्रकाच्या अटी व शर्ती सोबत जोडण्यात येत असून त्या ठेकेदारास बंधनकारक असतील. सदर अटी व शर्ती मान्य असल्यास दरपत्रक सादरीकरणाचे वेळी मान्यतेबाबत स्वाक्षरी करून दरपत्रकासोबत जोडण्यात याव्यात.

संचालक,
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली,
ता.दापोली, जि.रत्नागिरी.